गांवकरी
www.gavakari.net
17 Jan 2025 - Page 7

# दोन महिन्यांत १० हजारांहून अधिक व्यक्ती सायबर साक्षर

## 'केटीएचएम'च्या २० सायबर वॉरियर्सचा सत्कार




नाशिक : प्रतिनिधी

मविप्रच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत वीस विद्यार्थ्यांनी गेल्या दोन महिन्यांत १० हजारांहून अधिक व्यक्तींना सायबर सुरक्षेबाबत जागरूक केले.

या कामगिरीबद्दल सायबर वॉरियर्सना क्विक हिल कंपनीतर्फे प्रशस्तीपत्रक व पदक देऊन प्राचार्य डॉ.एस.एस.काळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सायबर वॉरियर्सना क्विक हिलतर्फे बेस्ट प्रोसेस प्लायन्स, हायेस्ट ऑफलाइन आउटरीच हायेस्ट ऑनलाइन आउटरीच या श्रेणीत पुरस्कार देण्यात आले.

संगणकशास्त्र विभागातील २० विद्यार्थ्यांनी गेल्या दोन महिन्यांत शाळा, महाविद्यालये, बस स्टॅन्ड, गोदाकाठ परिसर, पोलीस स्टेशन, ज्येष्ठ नागरिक संघ, उद्याने,मंदिरे , लहान मुले, स्त्रिया, वृद्ध नागरिक,अधिकारी यांना विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत जागरूक केले. सर्व विद्यार्थ्याचे मविप्र सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, व सर्व संचालक यांनी अभिनंदन केले आहे. क्लब ऑफिसर्स तेजल खराडे, साक्षी जाधव, श्रद्धा मोरे आणि सुवर्णा वाघमारे यांनी इतर वॉरियर्सना मार्गदर्शन करत ही सर्व कामगिरी पार पाडली.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रा. सुनिता देवरे, प्रा. ज्ञानेश्वर आहेर, प्रा. सीमा पाटील, प्रा. रोहिणी कापसे, प्रा. किर्ती मोरे, प्रा. भारती महाले, प्रा. केतकी भुसारे, प्रा. विद्या पानसरे, प्रा. नीलिमा मोरे, प्रा. कांचन गडाख आदी उपस्थित होते.

**पुरस्कारार्थी वॉरियर्स...**

कावेरी गाडेकर, साक्षी खैरनार, पुंडलिक पवार, गौरव चौधरी, साक्षी गवारे, प्रवीण दहातोंडे, श्रद्धा मोरे, ऋतिका राजपूत, तेजल खराडे, संस्कृती मुसळे, साक्षी आहेर, जयश्री पाटील.